अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २९ जुलै २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ३०० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## समाजाचा अध्यक्ष होण्याच्या कारणावरून युवकांची जबर मारहाण

✔ **सोलापूर** : तुझा भाऊ समाजाचा अध्यक्ष कसा झाला, समाजाचा अध्यक्ष कुमार जंगडेकरच आहे. असे म्हणून तेलगू भाषेत शिवीगाळ करून, दमदाटी करून यल्लप्पा कमलापूरे यांना लोखंडी रॉड, लोखंडी पाईप व लाकडी बांबूने मारहाण केली. तसेच डोळ्यावर, अंगावर चटणी टाकली. या मारहाणीत कमलापुरे जखमी झाले आहेत.

ही घटना साडेआठ वाजण्याच्या सुमारास घर नं. १३८, जय शंकर तालीमजवळ, मोदीखाना, जगजीवनराम झोपडपट्टी, मोदी, सोलापूर येथे घडली.

या मारहाणीत यल्लप्पा नरसप्पा कमलापूरे, (वय ५० वर्ष, रा. घर नं. १३८, जय शंकर तालीमजवळ, मोदीखाना जगजीवनराम झोपडपट्टी, मोदी, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून अजय जंगडेकर, रघु जंगडेकर, राजू जंगडेकर, रमेश जंगडेकर, हरीष जंगडेकर, मंगेश जंगडेकर, दिनेश जंगडेकर, लक्ष्मी जंगडेकर, यल्लुबाई जंगडेकर, सुनिता जंगडेकर, अश्विनी जंगडेकर, मल्लम्मा जंगडेकर (सर्व रा. जय शंकर तालीमजवळ, मोदीखाना, जगजीवनराम झोपडपट्टी, मोदी, सोलापूर) यांच्या विरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात (दि.२८) जुलै रोजी सकाळी ६ वाजता भा. न्या. सहिता कलम ११८(१), ११५,१८९(२),१९०,१९१(२), ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक निरीक्षक कुलकर्णी हे करीत आहेत.

# पंढरीला पुराचा धोका, दगडी पूल बुडाला, मंदिरे पाण्यात




✔ पंढरपूर/प्रतिनिधी

### उजनीसह वीर धरणातून चंद्रभागेत पाण्याचा विसर्ग सुरु

पुणे आणि सातारा परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे उजनी धरणातून तब्बल ७१ हजार ६०० तर वीर धरणातून ३२ हजार ६६३ क्युसेक विसर्गाने पाणी सोडण्यात येत असल्याने चंद्रभागेत प्रचंड पाण्याचा प्रवाह पोहचू लागला आहे. यामुळे चंद्रभागेची पाणी पातळी कमालीची वाढत चालली असून सोमवारी रात्री जवळपास एक लाख क्युसेक विसर्गने पाणी पात्रात पोचणार आहे. आधीच चंद्रभागेतील मंदिरे व वाळवंट आणि पाण्याखाली गेली आहे.

उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पुणे जिल्ह्यात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे दौंडमधून उजनीत येणारा विसर्ग वाढला आहे तसेच वीर धरणातून नीरा नदीतही विसर्ग वाढवण्यात आल्याने पंढरपूरजवळ एक लाख क्युसेकचा प्रवाह आहे.एकूणच हा वाढलेला विसर्ग पाहाता पंढरपूरला पुराला धोका असणार आहे.चंद्रभागेची पाणी पातळी वाढल्याने दगडी पूल तसेच वाळवंटातील मंदिरे पाण्याखाली गेली आहेत.मंगळवारी पुराचे पाणी नदी काठी असलेल्या शहरात घुसण्याची शक्यता आहे.

पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. त्यामुळे तेथील धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग उजनी धरणात येत आहे. उजनी धरण आणि वीर धरणातून १ लाखाहून अधिक विसर्ग पंढरपूरजवळ सुरू असून पंढरपूरमध्ये पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

सध्या श्रावण महिना असल्याने भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असून अशा धोकादायक पाण्यात भाविक स्नानासाठी उतरू लागल्याने धोका वाढत चालला आहे.

चंद्रभागेत सध्या पूरस्थिती निर्माण होत असताना आपत्ती व्यवस्थापन दिसत नाही. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. आता चंद्रभागा तीरावर कायमस्वरूपी आपत्ती व्यवस्थापन व्यवस्था उभी करण्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल. चंद्रभागेला नेहमीच अशी परिस्थिती येऊ लागली असून, काही दुर्घटनाही समोर येऊ लागल्याने आता गांभीर्याने याबाबत निर्णय घेतला जाईल असेही ते म्हणाले.

## उजनीतून भीमेत पुन्हा विसर्ग वाढवला

▸▸ उजनी ७१६०० तर वीरमधून ३५,५२३ क्युसेक पाणी सोडले

▸▸ वरच्या चौदा धरणातून ८० हजार ३९० विसर्ग सुरू

✔ सोलापूर-टेंभुर्णी/प्रतिनिधी

उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस पडत असल्यामुळे उजनीवरील १९ धरणांपैकी १४ धरणांतून ८० हजार ३९० एवढा विसर्ग सध्याला सोडला जात असल्यामुळे दौंड आणि बंडगार्डन मधील विसर्गामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे त्यामुळे उजनी धरणातून सोमवारी दिवसभरामध्ये २० हजार क्यसेकने पाणी वाढवून आता ते ७१ हजार ६०० एवढे केले आहे

त्यातच नीरा बेसिनमध्ये असणाऱ्या पाचही धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस चालू असल्यामुळे त्या धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सोडला जात आहे सध्याला त्या पाचही धरणातून ४५ हजार ५८१ क्युसेक्सचा विसर्ग चालू आहे त्यातच वीर धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग नीरा नदीमध्ये येतो आहे. भीमा आणि नीरा या दोन्ही नद्यांचा विसर्ग पाहिला तर एक लाखाच्या पुढे हा विसर्ग झाला आहे त्यामुळे बऱ्याच ठिकाणचे बंधारे पाण्याखाली गेले आहेत

सध्याला उजनी धरणात दौंड येथून ५२ हजार ४०० इतका क्युसेक विसर्ग येतो आहे. त्यात आणखी वाढ होताना दिसत आहे. सोमवारी सकाळी ४१ हजार ४०८ होता तो सायंकाळी आता.५२ हजार ४०० एवढा झाला आहे आणि बंड गार्डन चा विसर्गामध्येही सातत्याने वाढ होताना दिसते आहे त्याचा परिणाम दौंडच्या विसर्गात होत असल्याने दौंडमध्ये येणाऱ्या पाण्याचा विसर्गाचा अंदाज घेऊन उजनीतून भीमा नदीत पाणी सोडण्याची प्रक्रिया चालू आहे. कदाचित रात्रीत आणखी ही पाणी वाढ होण्याची दाट शक्यता आहे.

### उजनीतून कालवा ११०० क्युसेक

- ✔ बोगदा ४०० क्युसेक,
- ✔ सिना-माढा उपसा सिंचन योजना १८० क्युसेक,
- ✔ वीज निर्मितीसाठी १६०० क्युसेक,
- ✔ दहिगाव उपसा सिंचन ८० क्युसेक

### उजनी धरणावरील सर्व योजनांद्वारे पाणी सोडण्यात येत आहे

हवामान खात्याच्या अंदाजानुसार नुसार येत्या दोन दिवसात पुणे जिल्ह्यातील वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊसाची शक्यता वर्तवली असून धरण प्रशासनाला सतर्कतेचा इशारा दिला आहे. तातडीच्या उपाय योजना म्हणून नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. उजनी धरण ९७.६८टक्के भरले आहे. गेल्या दोन दिवसात उजनीच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू असून पुणे जिल्ह्यातील सर्व धरणे १०० टक्के भरलेली असून पाणलोट क्षेत्रात संततधार सुरू पाऊस सुरू आहे. त्यामुळे उजनीत बंडगार्डन व दौंड येथून येणाऱ्या विसर्गात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे उजनी प्रशासनाने खबरदारी म्हणून उजनीतून भीमा नदीला पाणी सोडण्यात आले आहे.

**नीरा खोऱ्यात असणाऱ्या चार धरणांपैकी चारही धरणातून सध्याला मोठ्या प्रमाणात विसर्ग चालू आहे तो आता चार धरणातून ४५५८१ चा विसर्ग सध्याला चालू आहे त्यामध्ये**

- ✔ गुंजवणी १५८०
- ✔ नीरादेवधर ५३४०
- ✔ भाटघर ७३५०
- ✔ वीर ३२६६३


असा विसर्ग नीरा खोऱ्यातून नीरा नदीमध्ये येतो आहे.

## विहिर-बोअरवेलच्या नोंदणीसाठी ९ हजारांची लाच घेताना खासगी व्यक्ती जाळ्यात

✔ सोलापूर/प्रतिनिधी

विहीर आणि बोअरवेलची नोंदणी करण्यासाठी एक खासगी व्यक्ती ९ हजारांची लाच घेताना सापडली.

तक्रारदार यांची वळसंग, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथे गट नं. १२८ येथे जवळपास एकूण ७ हेक्टर ५२ आर इतकी वडिलोपार्जीत शेतजमीन आहे. तक्रारदार व त्यांचे भाऊ यांच्यामध्ये रितसर मोजणी केल्यानंतर पोटहिस्सा होऊन नकाशे मिळाले होते. त्यानंतर यातील तक्रारदार यांच्या पोटहिश्श्यात असलेली विहिर व बोअरवेल याची नोंदणी होण्यासाठी आकारफोडबाबत उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय दक्षिण सोलापूर येथे आरोपी लोकसेवक यांना भेटून त्यांचा विनंती अर्ज सादर केला होता. हे काम करण्यासाठी १००००/- रु. लाचेची मागणी केली. तडजोडीअंती



रु.९,०००/- लाच रक्कम घेण्याचे मान्य केले.

ही लाचेची रक्कम खासगी इसम रिक्षा चालकास देण्यास सांगितली. त्यावरुन यातील आरोपी खासगी इसम यास रु. ९०००/- लाच रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात अँटी करप्शनला यश आले आहे.

याची तक्रार तक्रारदाराने सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. त्या अनुषंगाने लोकसेवक शंकर अरुण बजबळकर (वय ३० वर्षे) पद दुरुस्ती लिपीक, वर्ग- ३. नेम-उपअधीक्षक भूमी अभिलेख दक्षिण कार्यालय, सोलापूर सध्या रा. साईनाथ नगर, होटगी रोड, सोलापूर मूळ रा. मु.पो. तिप्पेहळी, ता. सांगोला, जि. सोलापूर. सूरज रविंद्र सर्वगोड (वय ३५ पद) खासगी इसम (रिक्षा चालक) रा. हौसेवस्ती, अमराई, मरीआई चौक, देगांव रोड, सोलापूर. आरोपी लोकसेवक व खासगी व्यक्तींविरुध्द सदर बझार पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७, १२ प्रमाणे (दि.२८) जुलै रोजी रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंदवण्याचे कामकाज सुरू होते. ही कामगिरी एस.व्ही. कोळी, संतोष नरोटे, गजानन किणगी पोकों राजु पवार, सचिन राठोड व राहुल गायकवाड व अक्षय श्रीराम सर्व नेमणूक लाचलुचपत प्रतिबंध विभाग सोलापूर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

## बदले की आग!

### श्रीनगरच्या लिडवासमध्ये भारतीय फौजींनी घातले कंठस्नान

✔ **श्रीनगर** : जम्मू-काश्मिरमध्ये चार महिन्यांपूर्वी पहेलगाम शहरात झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा भारतीय जवानांनी अखेर बदला घेतलाच. पर्यटनासाठी म्हणून गेलेल्या लोकांना जात-पंथ आणि धर्म विचारून भर दिवसा गोळ्या घालून त्यांचा जीव घेणाऱ्या चार पैकी तीन दशहतवाद्याचा सोमवारी पहाटे चकमकीत खात्मा झाला. भारतीय जवानांनी श्रीनगरमधील लिडवास येथे ही कारवाई केली. एकूण चार दहशतवादी होते. त्यापैकी तिघांना यमसदनी पाठवले. खात्मा झालेले तीनपैकी सुलेमान शाह आणि हासीम मुसा हे दोघे पहलगाम हल्ल्यात सहभागी होते. तिघेही पाकिस्तानी नागरिक आहेत. आतापर्यंत पहलगाम हल्ल्याशी संबंधित चारपैकी तिघांचा खात्मा झाला आहे, तर चौथ्याचा शोध सुरु आहे.

या हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूर ही मोहीम राबवून पाकला जशास तसे उत्तर दिले होते. त्यानंतर पाकला धडा शिकवला पण त्या चार अतिरेक्यांचे काय, असा प्रश्न विरोधी पक्षांकडून विचारला जात होता. ऑपरेशन सिंदून थांबलेले नाही, असे केंद्र सरकार वारंवार सांगत होते. त्याची प्रचिती अखेर आली. श्रावणातील पहिल्याच सोमवारी हा बदला घेतला गेला. त्यामुळे देशभर शंभू महादेवाचा गजर करण्यात आला.

२२ एप्रिल २०२५ रोजी पहेलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारतीय संरक्षण दलांनी ऑपरेशन सिंदूर राबवत या हल्ल्याचा बदला घेतला होता. हा हल्ला करणारे चार दहशतवादी पसार झाले होते. त्यामुळे पहलगाममध्ये निष्पाप भारतीयांची हत्या करणाऱ्यांना शिक्षा कधी मिळणार असा प्रश्न उपस्थित केला जात होता. दरम्यान, सोमवारी भारतीय लष्कराने ऑपरेशन महादेव राबवत श्रीनगरमधील लिडवास परिसरात तीन दहशतवाद्यांचा खात्मा केला. हे तिन्ही दहशतवादी पाकिस्तानी असल्याची माहिती समोर येत आहे. लष्कराने ठार केलेल्या दहशतवाद्यांपैकी हाशिम मुसा हा पहलगालम हल्ल्यातील मास्टरमाइंड असल्याचे समोर आले आहे. सुरक्षा दलांनी ऑपरेशन महादेव अंतर्गत एक मोठी कारवाई केली. लिडवासमधील चकमकीत ठार झालेला दहशतवादी हाशिम मुसा हा पहलगाम हल्ल्यातील मास्टरमाईंड होता. तसेच त्याने सोनमर्ग टनेल येथेही मोठा हल्ला घडवून आणला होता. त्या हल्ल्यात सात जण मारले गेले होते. त्यांच्यामध्ये सहा मजूर आणि एका डॉक्टरचा समावेश होता.हाशिम मुसा हा लष्कर ए तोयबाचा टॉप कमांडर होता. त्याला सुलेमान शाह मुसा फौजी या नावानेही ओळखले जात असे. तो पाकिस्तानच्या एसपीजीमधील पॅरा कमांडो होता. पहलगाम हल्ल्यानंतर तो दाचीगाम आणि लिडवासच्या जंगलांमध्ये लपून बसला होता.

## ४ पैकी ३ दहशतवाद्यांचा खात्मा पहेलगाम हल्ल्याचा घेतला सूड



### स्वदेशी ड्रोन आणि रडारचा वापर

या कारवाईदरम्यान, लष्कराने स्वदेशी ड्रोन आणि रडारचा वापर केला. ड्रोनच्या माध्यमातून दहशतवाद्यांच्या हालचालींवर रात्रभर नजर ठेवली गेली. तसेच थर्मच कॅमेऱ्यांच्या माध्यमातूनही त्यांचा शोध घेतला गेला. त्याशिवाय आयईडी नष्ट करण्यासाठी रोबोटचा वापर करण्यात आला. अखेरीस सकाळी बराच वेळ चाललेल्या चकमकीनंतर लष्कराने इथे लपलेल्या ती नही दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात यश मिळवले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आज आपली पुजा करतात!

संगम श्री डे
390-24-789

संगम श्री नाईट
379-95-339

कल्याण
334-05-168

मुंबई
137-13-779

## खंडणीखोर मास्टरमाईंड अभिजित जाधवची पोलीस कोठडीत रवानगी

### दुसरा साथीदार दीपक मानेच्या शोधासाठी पोलिसांची तपासाची चक्रे वेगात

- पोलिसी खाक्याचा बसणार हिसका उकळलेल्या त्या १६ लाखांचा तपासात होणार उलगडा ?
- परराज्यात पळालेल्या दुसऱ्या साथीदाराच्या शोधासाठी पोलिसांची तपासाची चक्र वेगाने सुरु
- सेवानिवृत्त गुरुजींना दिला पैशांसाठी पराकोटीचा त्रास; खोट्या केसेसचा केला बनाव, उकळली होती लाखोंची रक्कम

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**बाळ्यातील सेवानिवृत्त शिक्षकाकडून १६ लाख १० हजाराची खंडणी वसूल केल्याप्रकरणी फौजदार चावडी पोलिसांनी संशयित आरोपी अभिजीत जाधव याला अटक करून त्याला फौजदार चावडीचे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ओमशंकर शिवराज पाटील यांच्यासमोर हजर केले असता, त्याला चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.**

जाधव याचा दुसरा साथीदार दत्तात्रय ऊर्फ दीपक तुकाराम माने हा अद्याप पोलिसांना गुंगारा देत फरार आहे. त्याचे लोकेशन परराज्यात असल्याची माहिती समोर आल्याने पोलिस माने याच्या शोधासाठी तपासाची चक्रे वेगाने फिरवली जात असल्याचे पोलिस सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

बाळे कॉर्नर येथे अशीच घटना घडली असून सेवानिवृत्त दीपक भोसले गुरुजींना धमकावून त्यांच्याकडून तब्बल १६ लाखांची रक्कम वेळोवेळी उकळण्यात आली आहे. हे प्रकरण गळ्याशी आल्यानंतर गुरुजींनी थेट पोलिस ठाणे गाठले आहे. सुमारे दोन वर्षांच्या कालखंडात दोन व्यक्तींनी भोसले गुरुजींकडून १६ लाख इतकी रक्कम वसूल केल्याचे पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी फिर्यादी दीपक भोसले यांच्या फिर्यादीवरून दत्तात्रय माने आणि अभिजीत जाधव यांच्या विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन संशयित आरोपींपैकी एकाला पोलिसांनी अटक केली आहे.

### गंभीर गुन्ह्यांचा लखोटा सर्वत्र एकच बोलबाला...

संशयित आरोपी अभिजीत जाधव हा सराईत गुन्हेगार असल्याचे पोलिस सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल झाले असून त्यावर तडीपारीची कारवाई करण्यात आली होती. परंतु त्याने राजकीय वजन वापरून तडीपारी रद्द केल्याची चर्चा ऐकण्यास मिळत आहे.

अभिजीत जाधव असे अटकेत असलेल्या खंडणीखोर संशयित आरोपींचे नाव आहे. या घटनेमागे हाच खरा मास्टरमाईंड असल्याचे पोलिस सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. दोन वर्षांच्या कालावधीत एकूण १६ लाख १० हजार रुपये भोसले यांच्याकडून त्या दोघांनी उकळले. तुमच्याविरुद्ध उच्च न्यायालयात केस दाखल करणार असल्याची खोटी बतावणी करत आणखीन १५ लाखांची मागणी केली. मात्र भोसले यांच्याकडे इतकी रक्कम शिल्लक नसल्याने त्यांनी शेवटी पोलीस ठाण्यात धाव घेतली. दिपक प्रल्हाद भोसले, (वय- ५८ वर्षे) व्यवसाय सेवानिवृत्त शिक्षक, राहणार प्लॉट क्र. ५. लक्ष्मी नगर, चंडक प्रशाले जवळ, बाळे, सोलापूर यांच्या फिर्यादीवरून अभिजीत रमेश जाधव, दत्तात्रय ऊर्फ दिपक तुकाराम माने, रा. दोघे सोलापूर यांच्या विरोधात दि.२६ जुलै) रोजी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक डी पाटील हे करीत आहेत.